88
13/02/2023

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां.१/ ३९६ /२०२३
दिनांक : १० /०२/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-अंतिम योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४(५) अन्वये योजनेस प्रशासकीय मान्यता)

प्रस्तावना :

१. मौजे हडपसर, पुणे येथील स.नं. १२१/२ पैकी, (सि.स.नं.१७१७ पैकी, १७१८ ते १७२३) (शेवकर वस्ती झोपडपट्टी) संदर्भात ७८०.०० चौ. मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. १२/०८/२०११ रोजी सदर मिळकतीवरील ८८.८८ टक्के झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदर प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार खालीलप्रमाणे विहित कार्यवाही पार पाडली आहे.

अ) उक्त अधिनियमाचे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून दि.१०/०२/२०१४ रोजीच्या एकत्रित आदेशाद्वारे घोषित करण्यात आले व महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र पृष्ठ क्र.२६ दि.२०/०२/२०१४ ते २६/०२/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

आ) उक्त अधिनियमाचे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निमूर्लन आदेश जा.क्र. झोपुप्रा/तां.४/प्र.क्र.१३५/झोनिआ/१३३९/२०१४ दि. २४/०७/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

इ) सक्षम प्राधिकारी यांनी दि. ११/०९/२०१३ रोजी झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट – २) करण्यात आली आहे.

३. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.२०/१२/२०२२ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. ४(३) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) सदर प्रकरणी प्राधिकरणाकडे सदर प्रारूप योजनेबाबत एक लेखी हरकत प्राप्त झाली. सदर हरकतींचा विचार करण्यात आला व सदर बाबत दि.१०/०२/२०२३ रोजी आदेश पारित करणेत आला आहे. त्याबाबतची कारणमिमांसा नमूद करून स्वतंत्र अभिलेख प्राधिकरणाच्या कार्यालयात उपलब्ध ठेवण्यात आले आहेत.

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

४. सदर प्रारुप योजनेसंदर्भात सर्व संबंधितांचे म्हणणे व दाखल असलेली कागदपत्रे आणि पुरावे विचारात घेऊन या प्राधिकरणामार्फत दि. १०/०२/२०२३ रोजी सदर क्षेत्रासंबंधीत उपलब्ध केलेल्या प्रारूप योजनेस उक्त नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४(५) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

५. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

६. सदर योजनेद्वारे विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणें अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

७. सदर योजनेचे विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

सदरची अंतिम योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली असून प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १० /०२/२०२३

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED ★Pune-Pimpri-Chinchwad Area★

10.2.23

(नीलेश र. गटणे)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :
१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
-सक्षम प्राधिकारी क्र.१
-सहा.निबंधक सहकारी संस्था – सदर प्रकरणी सह.संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.

-संगणक शाखा - सदर आदेशास संकेत स्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी.

३. विकसक तथा जमीन भोगवटादार मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि.
   १०,सदानंद अपार्टमेंट, ४था मजला ,मोडेल कॉलनी, बाबा हॉस्पिटल जवळ शिवाजीनगर, पुणे -४११०१६

४. मौजे हडपसर, पुणे येथील स.नं. १२१/२ पैकी, (सि.स.नं.१७१७ पैकी, १७१८ ते १७२३) शेवकर वस्ती येथील झोपडपट्टीवासीयांचे माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area